# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक
गडचिरोली दि. ०५/०९/२०१७

## पोलीस अधिक्षक कार्यालय येथे बालन्याय मंडळ कार्यशाळा संपन्न

- ***पोलीस अधिक्षक कार्यालय, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व बाल न्याय मंडळ यांचा सहभाग***

दिनांक ०३/०९/२०१७ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व बालन्याय मंडळ यांच्या संयुक्त विद्यामाने पोलीस अधिक्षक कार्यालय येथे बाल न्याय मंडळ कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. बाल न्याय काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ अंतर्गत कायदेशिर तरतूदी, पोलीस विभाग, बाल न्याय मंडळ तसेच बाल कल्याण समिती यांची कर्तव्ये व त्यांची भुमिका याचबरोबर काळजी व संरक्षणाची आवश्यकता असलेले बालक व विधीसंघर्षग्रस्त बालक यांचे पुनर्वसन याबाबतचे मार्गदर्शन श्रीमती ज्योती खांदपाचोळे, सामाजिक कार्यकर्त्या टाटा इन्स्टिटयुट मुंबई व श्री प्रविण खांदपाचोळे, संचालक दिशा सामाजिक संस्था अमरावती यांनी केले.

सदर कार्यशाळेकरीता प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. संजय मेहरे, दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर श्री. टी. के. जगदाळे, मुख्य न्यायदंडाधिकारी श्री. बी. एम. पाटील, जिल्हा न्यायधीश-१ तथा सत्र न्यायधीश श्री. यु. एम. पदवाड, जिल्हा न्यायधीश- २ तथा सत्र न्यायधीश श्री. एस टी सुर, पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख, एकात्मिक विकास प्रकल्प अधिकारी श्री. बिपीन इटनकर, बाल न्याय मंडळ अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर श्री. एन. सी. बोरफळकर, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर श्री. एन. पी. वासाडे तसेच जिल्हयातील इतर न्यायाधिश वृंद, बाल न्याय मंडळाचे सदस्य, बाल कल्याण समितीचे अध्यक्ष, सदस्य तसेच जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

